आवक क्र. / वर्ष ४४६
औद्योगी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे

औद्योगी उपमहानिरीक्षक
औद्योगी महानिरीक्षक

महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण, २००६ ला दि.३० नोव्हेंबर,२०११ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र. आयआयआय-पॉलिसी २०११/(प्र.क्र. २३५)/उद्योग-२
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९ ऑगष्ट, २०११

संदर्भ :१) शा.नि.क्र. आयआयआय-पॉलिसी २०११/(प्र.क्र. ५९)/उद्योग-२, दि. ३१ मार्च, २०११
२) शा.नि.क्र. आयआयआय-पॉलिसी २०११/(प्र.क्र. १६६)/उद्योग-२, दि. २९ जून, २०११

**शासन निर्णय -**

शासन निर्णय क्रमांक : आयआयआय-पॉलिसी २००६/(प्र.क्र.१३४६)/उद्योग-२, दि.२२.२.२००७ अन्वये जाहिर करण्यात आलेल्या महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ चा वाढीव कालावधी दि. ३० जून, २०११ रोजी समाप्त झाला असल्याने संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये त्यास दि. ३१ ऑगष्ट, २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. नवीन औद्योगिक धोरण २०११ तयार करण्याची प्रक्रीया अंतिम टप्प्यात असल्याने तसेच उक्त धोरणाचा वाढीव कालावधी दि. ३१ ऑगष्ट, २०११ रोजी समाप्त होत असल्याने प्रचलित राज्य औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण २००६ ची मुदत दि. ३० नोव्हेंबर, २०११ पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९२/व्यय-१६/११, दिनांक २४ ऑगष्ट, २०११ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. ह. कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव